पीएच.डी., संशोधन आराखडा

"रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास"

कला विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास शोध प्रबंधाचा आराखडा सादर

संशोधक

धामणगांवकर शारदा किशन

(एम.ए.,एम.एड., एम.फिल., डी.एस.एम.)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे

मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

: संशोधन केंद्र :

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

मे - २०१७

अनुक्रमणिका

१. प्रस्तावना

२. उद्दिष्ट्ये

३. गृहितके

४. विषयाची व्याप्ती व मर्यादा

५. विषयाचे महत्त्व

६. संशोधन पद्धती

७. संशोधन आराखड्याचे प्रारूप

८. संदर्भ ग्रंथ सूची

१. प्रस्तावना

साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब असते. साहित्य आणि समाज यांचे अनुबंध अतुट असतात. साहित्यामध्ये नवनवीन विचारप्रवाह बदलत्या काळानुरूप आले. १९६० च्या नंतर मराठी साहित्यामध्ये दलित साहित्य, स्त्री साहित्य, विद्रोही साहित्य, ग्रामीण साहित्य इत्यादी प्रकार साहित्यामध्ये आले. दलित साहित्यामध्ये येणाऱ्या वास्तवतेचे चित्रण, विद्रोह यामुळे दलित लेखकांनी त्यांच्या लेखनातून नव्या जाणिवा, शोषण, जुलूम, अत्याचार, अन्याय, अंधश्रद्धा, भूक, उपासमार इत्यादी बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

दलित साहित्याचे श्रेय हे बुद्ध कबीर, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारधारेला जाते. या विचारामुळे दलित व्यक्तीमध्ये पर्यायाने दलित लेखकामध्ये स्वतःबद्दल लिहिण्याची प्रेरणा मिळाली आणि यातूनच 'स्व' ची जाणीव निर्माण झाली व स्वतःच्या अस्तित्वाबद्दलची अभिव्यक्ती या लेखकांनी साहित्याच्या विविध वाङ्मय प्रकारांतून केलेली दिसते. भटक्या-विमुक्त जातीमध्ये शिक्षणाचे वारे लवकर पोहचले नाही त्यामुळे हा समाज देश स्वतंत्र झाला तरी त्यांना स्वबद्दलचे आत्मभान लवकर येऊ शकले नाही. सभोवतालच्या समाजाबद्दलची जाणीव त्यांना झाली. फुले-शाहू-आंबेडकर या विचारधारेमुळे त्यांना प्रेरणा मिळाली आणि ही प्रेरणा घेऊन भटके विमुक्तही साहित्य लिहू लागले. त्यांच्या जीवनजाणिवा साहित्यातून आविष्कृत करू लागले.

मानवी जीवनातील वास्तव दर्शन साहित्याच्या माध्यमातून सूचकपणे मांडले जाते. साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, कविता इत्यादी वाङ्मयप्रकाराचा अंतर्भाव होतो. साहित्याचा आवाका व्यापक असून साहित्यातील महत्त्वाचा प्रकार म्हणजे कादंबरी आहे. मानवी जीवनाचे समग्र दर्शन कादंबरीत घडत असते.

१९६० नंतर दलित, पीडित, गावकुसाबाहेरील लोकांच्या जीवनाविषयी सहानुभूतीपूर्वक लेखन झाले. या लेखनाच्या माध्यमातून दलित वर्गाला वाचा फोडण्याची संधी प्राप्त झाली आणि यामधूनच रामचंद्र नलावडे सारख्या लेखकांनी आपल्या वेदनाश्रूंना साहित्याच्या रूपाने वाट मोकळी करून दिली यांनी समाजातील वेगवेगळ्या प्रश्नावर आणि समस्येवर आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रकाश

टाकला आहे. रामचंद्र नलावडे यांच्या साहित्याने एक आपली वेगळी ओळख साहित्यातून निर्माण करून दिली आहे. म्हणूनच त्यांच्या कादंबरी वाङ्मयाचे संशोधन करण्याचे मी ठरविले आहे.

२. उद्दिष्ट्ये :

१) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीतील कृषक जीवनातील समस्यांचा शोध घेणे.

२) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीतील विद्रोहाचे स्वरूप अभ्यासणे.

३) निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्षाचा मागोवा घेणे.

४) भटक्या-विमुक्तांच्या जीवन-जाणिवेचे दर्शन कसे घडविले, याचा शोध घेणे.

५) शोषक आणि शोषित यांच्यातील अंतर्गत संघर्षाचे आकलन करून घेणे.

६) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीतील सौंदर्यस्थळांचा शोध घेणे.

७) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीचे बलस्थाने आणि मर्यादा जाणून घेणे.

३. गृहितके :

१) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण भागातील जीवन-जाणिवा चित्रित झालेल्या आहेत.

२) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यातून शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना यांचे चित्रण आलेले आहे.

३) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यामधून ग्रामीण भागातील वातावरण व बदललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण चित्रित झाले आहे.

४) रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीत भ्रष्टाचाराविरोधातील विद्रोहाचे दर्शन घडताना दिसते.

५) निसर्गाची बदललेली रूपे आणि मानवी वर्तन यांच्यातील संघर्षाचे चित्रण दिसून येते.

६) निसर्ग बदलाबरोबर मानवी वर्तमानातही बदल झालेला त्यांच्या कादंबरीत पहावयास मिळतो.

७) निसर्गाची अवकृपा आणि माणसांचे जगणे याचे यथार्थ दर्शन त्यांच्या कादंबऱ्यांत घडताना पहावयास मिळते.

८)	रामचंद्र नलावडे यांची कादंबरी नैतिक मूल्यांची कास धरताना दिसून येते.

९)	निसर्ग आणि मानव यांच्या अभेद नात्याचे दर्शन त्यांच्या कादंबरीत पहावयास मिळते.

४. विषयाची व्याप्ती व मर्यादा :

रामचंद्र नलावडे हे नवीन पिढीतील दमदार व दर्जेदार असे लेखक आहेत. त्यांनी कथासंग्रह, आत्मकथन, संशोधनपर ग्रंथ, व्यक्तिचित्रे, कादंबरी अशा वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारात लेखन केले असले तरी प्रस्तुत संशोधनामध्ये रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास हा विषय मी निवडला आहे. हीच माझ्या संशोधनाची मर्यादा आहे. रामचंद्र नलावडे यांच्या एकूण सात कादंबऱ्या असून त्यांच्या कादंबरीत स्वभावदर्शन, त्यांनी हाताळलेले वेगवेगळे प्रश्न, त्यांच्या कादंबरीतील भाषाशैली, वातावरण, कथानक, कादंबरीतील संघर्ष, मानवी वृत्ती-प्रवृत्ती, सांस्कृतिक दर्शन इत्यादी घटकांचा सूक्ष्म अभ्यास संशोधनात करावयाचा आहे, ही माझ्या संशोधनाची व्याप्ती आहे.

रामचंद्र नलावडे यांनी कादंबरी या वाङ्मय प्रकारातून फक्त दलित कादंबऱ्या लिहिल्या नाहीत तर गरीब शेतकऱ्यांचे दु:ख व वेदना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'लाडी', 'पातेरा', 'प्रहार', 'चंदनवाडी', 'थैमान', 'कुरण', 'खोत' या कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण भागातील बदललेलं वातावरण त्यांच्या कादंबरीत आले आहे. शहरी, ग्रामीण, दलित, भटक्या-विमुक्तांचे बदललेले समाजजीवन, होत चाललेला मूल्यांचा ऱ्हास, वाढत्या भ्रष्टाचारामध्ये खेड्यापाड्यातील आणि शहरातील गरीब जनता भरडली जात आहे. याचा सूक्ष्मवेध कादंबरी लेखनातून घेतला आहे. समग्र मानवी जीवनाचा पटच ते आपल्या वेगवेगळ्या कादंबऱ्यांतून उभा करतात, हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे वेगळेपण आहे.

रामचंद्र नलावडे यांच्या साहित्य लेखनातून आणि त्यांना मिळालेल्या पुरस्कारांवरून त्यांचे साहित्य हे उत्तम व दर्जेदार असल्याची प्रचिती येते. लेखकाची ओळख साहित्य जगताला समीक्षा आणि संशोधनाने होत असते. दुर्दैवाने रामचंद्र नलावडेंसारख्या लेखकावर अपेक्षेप्रमाणे समीक्षा झाली नाही. त्यांचे साहित्य नवीन पिढीला प्रेरणादायी स्वरूपाचे आहे. एका वेगळ्या जगाची गंधवेदना

त्यांच्या साहित्यातून आविष्कृत होते. वडार समाजाच्या व्यथा, वेदना त्यांच्या साहित्यातून आविष्कृत झाल्या आहेत, याचा शोध संशोधनातून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

५. विषयाचे महत्त्व :

१९६० नंतर स्वातंत्र्योत्तर काळात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य यामधून दलित, पीडित, गावकुसाबाहेरील लोकांच्या जीवनाविषयी सहानुभूतीपूर्वक लेखन झाले. अनुभूतीची अभिव्यक्ती स्वातंत्र्यानंतरच्या काळातील वाङ्मय प्रकारामध्ये दिसून येते. या लेखनाच्या माध्यमातून दलित वर्गाला वाचा फोडण्याची संधी प्राप्त झाली आणि यातूनच नलावडे सारख्या लेखकांनी आपल्या व्यथा, वेदना साहित्याच्या रूपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांमधून शेतकऱ्यांचे दुःख व वेदना तसेच ग्रामीण भागातील बदललेले चित्रण, निसर्ग व मानव यांच्यातील संबंधाचे दर्शन घडते. कादंबरी हा वाङ्मय प्रकार महत्त्वाचा असून रामचंद्र नलावडे यांनी वेगवेगळ्या मानवी जीवनातील समस्यांचे दर्शन घडविलेले आहे. एका उपेक्षित भटक्या-विमुक्तांच्या जीवनाची ओळख या संशोधनातून होणार आहे. यासाठीच हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

रामचंद्र नलावडे हे संवेदनशील लेखक आहेत. त्यांना कादंबरी वाङ्मयाची उत्तम जाण आहे. त्यांनी वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारात विपूल लेखन केले असले तरी कुठल्याही विद्यापीठात त्यांच्या कादंबरी वाङ्मय प्रकारावर संशोधन झाले नाही. रामचंद्र नलावडे यांनी एकूण सात कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीचे दालन समृद्ध आणि संपन्न केले आहे. रामचंद्र नलावडे अतिशय संयमी, तटस्थपणे समाजातील वेगवेगळ्या प्रश्नावर प्रकाश टाकतात, हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे वेगळेपण आहे. त्यांच्या कादंबरीने एक आपली वेगळी ओळख मराठी साहित्याला करून दिली आहे. त्यांची कादंबरी वेगळ्या समाजाचे, समाजातील माणसाचे प्रतिनिधीत्व करते आहे. म्हणूनच मी त्यांच्या कादंबरी वाङ्मयाचा संशोधनासाठी विषय निवडलेला आहे.

६. संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन करताना विविध संशोधन पद्धतीचा आधार घेऊन संशोधन करावे लागणार आहे. एखाद्या विषयाचा विविध पद्धतीने किंवा दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास त्या विषयाला चांगल्या प्रकारे न्याय देता येते. त्यासाठी प्रस्तुत संशोधन करताना चरित्रात्मक, ऐतिहासिक संशोधन, सामाजिक, मानसशास्त्रीय, आस्वाद, मार्क्सवादी व सौंदर्यवादी संशोधन पद्धतीचा उपयोग करणार आहे.

७. संशोधन आराखड्याचे प्रारूप

रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास

प्रकरण पहिले

समकालीन मराठी कादंबरी आणि रामचंद्र नलावडे

संशोधनाचे पहिले प्रकरण रामचंद्र नलावडे यांच्या समकालीन ज्या लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे त्याचा स्थूलमानाने आढावा घ्यायचा आहे. समकालीन कादंबरी लेखक ल.सी. जाधव, विश्वनाथ कोनाळे, रामराव झुंजारे, बाबा कोंटबे, सदानंद देशमुख, बालाजी मदन इंगळे, बाबू बिरादार इ. कादंबरीकारांच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप, त्यांच्या कादंबरीतील प्रश्न, समस्यांचे दर्शन, समकालीन कादंबरीकाराचे कादंबरी लेखनातील साम्य आणि वेगळेपणाचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

प्रकरण दुसरे

रामचंद्र नलावडे व्यक्ती आणि कर्तृत्व

सदरील प्रकरणात रामचंद्र नलावडे यांचे बालपण, जन्म, संस्कार, प्रेरणा, प्रभाव, शिक्षण, जडणघडण, वैवाहिक जीवन, परिस्थिती, सामाजिक, शैक्षणिक, वाङ्मयीन कार्य त्यांना मिळालेले पुरस्कार यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीचे स्वरूप

उपरोक्त प्रकरणामध्ये रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे. कादंबरीतील मानवी जीवन जाणिवा, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जीवनदर्शन, मानवी वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रण, कादंबरीतील संघर्ष या घटकांच्या आधारे या प्रकरणाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीतील व्यक्तिचित्रण

रामचंद्र नलावडे यांच्या कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे. यात पुरुष व्यक्तिचित्रण व स्त्री व्यक्तिचित्रण तसेच सुष्ट व दुष्ट व्यक्तिचित्रण, पात्रांचे स्वभावदर्शन, व्यक्ति-व्यक्तिमधील संघर्ष, मानवी वृत्ती-प्रवृत्तीमधील संघर्ष लेखकांनी कसे घडविले आहे याचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रकरण पाचवे

कादंबरीचे वाङ्मयीन विशेष

संशोधनाच्या पाचव्या प्रकरणात कादंबरीचे कथानक, संवाद, व्यक्तिचित्रण, निवेदनशैली, वातावरण, भाषाशैली, रसपरिपोष, अलंकार, प्रतिक, प्रतिमा, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषितवजा वाक्य इत्यादी वाङ्मयीन विशेषाचा शोध रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांतून घ्यावयाचा आहे. त्यांच्या कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन करून त्यांच्या कादंबरीचे बलस्थान आणि मर्यादा याचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष / उपसंहार

प्रकरण एक ते पाच मध्ये संशोधनांती जे निष्कर्ष हाती येतील ते या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ

परिशिष्ट्ये

लेखकाचे छायाचित्र

८. संदर्भ ग्रंथ सूची

१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - संपा.अ.ना. देशपांडे

२) अर्वाचिन मराठी वाङ्मयाचा इतिहास - डॉ.प्र.न. जोशी

३) आधुनिक मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी - गो.म. कुलकर्णी

४) मराठी कादंबरीचे शतक - कुसुमावती देशपांडे

५) मराठी कादंबरीतील नैतिकता - डॉ.किशोर सानप

६) मराठी कादंबरी विश्लेषण आणि विवेचन - बालशंकर देशपांडे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे

मराठी विभाग प्रमुख

श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर

संशोधक

धामणगावकर शारदा किशन